<u>नियमीत दिवाणी दावा क्र. १६७/१९८८ मधील निशाणी ४१० खालील आदेश.</u>

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. ४ यांच्या विरुध्द झालेला अबेटमेंन्टचा आदेश रद्द होवुन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**<u>प्रस्तुत अर्जातील वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–</u>**

२. प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र. ४ हे दिनांक ०२/०५/२०२१ रोजी मयत झाले आहेत. वादीने मुदतीत त्यांचे वारस रेकॉर्डवर घेतलेले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विरुध्द प्रस्तुतचे प्रकरण हे अबेट झालेले आहे. प्रतिवादी क्र. ५ विरुध्द झालेला अबेटमेंन्टचा आदेश रद्द झाल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट आदेश रद्द न झाल्यास वादीचे नुकसान होईल. त्यामुळे वादीतर्फे प्रतिवादी क्र. ४ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंन्टचा हुकुम रद्द होवुन मिळावा अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली.

३. प्रतिवादी यांनी निशाणी ४१५ वर त्यांचे म्हणणे दाखल केले व अर्जातील कथनांना तीव्र आक्षेप नोंदविलेला आहे. प्रतिवादींच्या मते अर्जात नमूद केलेले कारण हे खोटे व लबाडीचे आहे. प्रतिवादी क्र. ४ हा वादीचा नातेवाईक आहे. वादीला प्रतिवादी क्र. ४ च्या मृत्युची माहीती पहिल्यापासुन होती. प्रतिवादी क्र. ४ च्या मृत्युनंतर सर्व धार्मीक विधीमध्ये वादीने सहभाग घेतला आहे. त्यामुळे अर्जात नमूद केलेले कारण हे योग्य व संयुक्तीक नाही. वादीच्या निष्काळजीपणामुळे विलंब झालेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती प्रतिवादीतर्फे करण्यात आली.

४. प्रतिवादी क्र. ४ च्या वारसांनी सदर अर्ज मंजुर करण्यास हरकत नसल्याचे कथन केलेले आहे.

५. अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे यांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद

ऐकला.

६. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने सदरचा दावा हा मालकी घोषीत होण्यासाठी तसेच निरंतर ताकीदीसाठी व वैकल्पीकरित्या ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ यांच्या वारसांना दाव्यामध्ये पुढे समाविष्ठ करण्याचा अधिकार राहतो. वादीने प्रस्तुत अर्जासोबत शपथपत्र दाखल केलेले आहे. प्रस्तुत दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी प्रतिवादी क्र. ४ चे वारस अभिलेखावर असणे आवश्यक आहेत. प्रतिवादी क्र. ४ च्या विरुध्द झालेला अबेटमेंन्टचा आदेश रद्द केला तर प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज रक्कम रुपये २००/– च्या खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाची पुर्तता केल्यानंतर प्रतिवादी क्र. ४ चे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

Digitally signed by ATUL BHIMRAO PATIL
Date: 2022.09.15 14:55:10 +0530

कोरेगाव.
दि. १४/०९/२०२२

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.